


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६५८. वा | रविवार | दि. २१ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# श्रीरामलल्ला जन्मभूमी प्राणप्रतिष्ठा सोहळा निमित्त भव्य शोभायात्रेत बुलढाणा नगरी झाली भगवमय...

## जय श्रीराम जय जय श्रीराम जय घोषाने दुमदुमली बुलढाणा नगरी...

जनसंचलन/बुलढाणा

जय श्रीरामाच्या जयघोषात स्वंयस्फुर्तीने रामभक्तांची श्रीरामजन्मभूमी मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा निमित्त शहरात वाजत गाजत शेकडो महिला रामभक्त कलश, भजन, फुगडी, फटक्यांच्या आतिष बाजीने अश्वारुढ रथात केलेल्या विविध वेशभूषांची भव्य दिव्य शोभा यात्रा दि. २० जानेवारी रोजी काढण्यात आली. येथील सुवर्ण गणेश मंदिर संगम चौक येथून श्री सदभावना सेवासमिती, श्रीराम मारूती मंदिर तसेच श्रीराम नवमी शोभायात्रा समितीच्या वतीने आयोजित भव्य शोभा यात्रेत अश्वरथावर आरूढ प्रभू रामचंद्राची भव्य मूर्ती, श्रीराम सिता, लक्ष्मण, अशोकवाटीकेतील शबरीची श्रीराम भेट ही वेशभूषा वयोवृद्ध माधवी नाईक यांनी हुबेहुब सादर केली. भगवान शंकराच्या श्रीकेवट प्रसंग आकर्षक वेशभूषांनी सर्वाचे लक्ष वेधून घेत होत्या. टाळ मृदग, फुगडी, खेळत माहेश्वरी, राजस्थानी समाज मंडळ, पंतजली योग साधना, तसेच विविध महिला भजनी मंडळाची जय श्रीरामचा जयघोष करीत जयस्तंभ चौक मार्गे, बजार लाईन भारतमाता चौक, कारंजा चौक, मार्गे निघालेल्या या शोभायात्रेतील रामभक्तांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. जयस्वाल युवा मंचतर्फे सर्वांना गोड दुधाचे वाटप करण्यात आले शोभायात्रा समितीच्या वतीने रामभक्तांनी अयोध्या अक्षता वितरण करण्यात आले.









ठिकठिकाणी रांगोळी काढण्यात आली होती. प्रचंड उत्साहात निघालेल्या शोभायात्रेचे सर्वांनी उस्फुर्तपणे स्वागत केले. कारंजा चौक दुर्गा उत्सव समिती तर्फे खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले. राजस्थान युवा मंच, अग्रवाल मित्र मंडळांनी शरबत व पाणी वाटप करण्यात आले.

या शोभायात्रेत सदभावना सेवा समितीचे राधेश्यामजी चांडक उर्फ भाईजी यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. राजमाता जिजाऊने ज्याप्रमाणे रामायाण महाभारताच्या गोष्टी सांगून शिवबा घडविले त्याप्रमाणेच आपल्या मुलांवर श्रीरामांच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगुन संस्कार करावेत ज्यामुळे भावी पिढी आदर्श होईल असे आवाहन रामलल्ला प्रतिष्ठापनेच्या समारंभा निमित्त राधेश्यामजी चांडक यांनी केले होते. त्यांच्या या आवाहनाला बुलढाणा शहर वासियांनी भव्य प्रमाणात प्रतिसाद दिला आहे. घराघरातून महिला,वृध्द लोक, लहान बालक पुरूष मंडळी मोठ्या संख्येने या भव्य शोभायात्रा मध्ये सहभागी झाले होते.बुलढाणा शहरात भगवमय वातावरण दिसून आले आहे.

या शोभायात्रा मध्ये बुलढाणा अर्बनचे कार्याकारी संचालक डॉ सुकेशजी झंवर,बुलढाणा विधानसभा आमदार संजय गायकवाड,अमरावती पदवीधर मतदार संघाचे विधान परिषदेचे आमदार.धिरज लिंगाडे, माजी आमदार तथा बुलढाणा भाजप लोकसभा प्रमुख विजयराज शिंदे, योगेंद्र गोडे, जगदेवराव बाहेकर, गोकूळ शर्मा, राजेश देशलहरा, अँड जितेंद्र कोठारी, श्रेयश देशमुख, वैभव परांजपे, नितीन जयस्वाल, प्रकाचंद्र पाठक, मिना कुळकर्णी, सुवर्णा देशमुख, विजया राठी, वैजयंती कस्तूरे, डॉ. संगीता लध्दड, अंजली परांजपे, डॉ. सुकेश झंवर, अमित कुळकर्णी, प्रशांत देशपांडे, शैलेश कमानी, सिद्धार्थ शर्मा, नगरसेवक हांडे, मंदार बाहेकर, संजय कुळकर्णी, अशोक शर्मा, बाळासाहेब गिर्हे, चंपालाल शर्मा, रविंद्र लध्दड, विजय जोशी, राजेश हेलगे, रमेश पंजाबी, डॉ. प्रविण भाले, विजय शर्मा, प्रविण चिंचोळकरा अँड. कवीमंडन, सुरेश गट्टानी, तसेच समितीचे सर्व पदाधिकारी व रामभक्त सहभागी झाले होते. शोभायात्रेचा समारोप श्रीराम मंदिर येथे महाआरतीने करण्यात आला. याप्रसंगी डॉ. प्रमोद देशपांडे, मधूसूदन कूळकर्णी, नानासाहेब केसाळे, रमानंद कविश्वर, नितीन भालेराव, विजय व्यवहारे, आशुतोष वाईकर, सुयश अन्वेकर यांनी सर्व रामभक्तांचे स्वागत केले.या शोभायात्रेचा समारोप हा कारांजा चौक येथे माँ दुर्गा माता मंदिर येथे भक्तांना खिचडी वाटप करून करण्यात आला आहे

## मतदारयादी विशेष पुनरिक्षण कार्यक्रमात अंतिम मतदारयादी मंगळवारी प्रसिध्द होणार...

जनसंचलन/बुलढाणा

भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व विधानसभा मतदारसंघाची अंतिम मतदारयादी आता दि. २३ जानेवारी २०२४ रोजी जिल्ह्यातील सर्व पदनिर्देशित ठिकाणी प्रसिध्द करण्यात येणार आहे. अंतिम मतदारयादी ही सोमवार, दि. २२ जानेवारी २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार होती. परंतू या दिवशी सुट्टी जाहीर करण्यात आल्याने ही यादी दि. २३ जानेवारी २०२४ रोजी यादी प्रसिध्द करण्यात येईल. भारत निवडणूक आयोगाने दि. १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर मतदारयादीचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुधारित पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अंतिम मतदारयादी प्रसिध्द करण्याचा दि. २२ जानेवारी २०२४ असा होता. परंतु राज्य शासनाने सोमवार, दि. २२ जानेवारी २०२४ रोजी श्री रामलल्ला प्राणप्रतिष्ठेनिमित्त सार्वजनिक सुट्टी जाहिर केली आहे. सदर पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत दि. २७ ऑक्टोबर २०२३ रोजी प्रारूप मतदारयादी प्रसिध्दीनंतर सर्व विधानसभा मतदारसंघ व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचे स्तरावर प्राप्त दावे व हरकती निकालात काढल्यानंतर अंतिम मतदारयादी आयोगाकडून उपलब्ध होणार आहे. सदरची मतदारयादी दि. २३ जानेवारी २०२४ रोजी यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. आगामी लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर अंतिम मतदारयादीमध्ये आपले नाव समाविष्ट आहे किंवा नाही याची मतदारांनी खात्री करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ॲड.शर्वरी तुपकरांसह कार्यकर्ते शेतकऱ्यांवर मेहकर, मलकापूरात गुन्हे दाखल....

**जनसंचलन/बुलडाणा**

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी पुकारलेल्या रेल्वे रोको आंदोलन प्रकरणी पोलिसांनी तब्बल ९० पदाधिकारी व कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हे दाखलकेले आहे. सोयाबीन-कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी केलेले हे आंदोलन पोलिसांच्या डोळ्यात भरले आहे. आता न्याय मागणे ही गुन्हा ठरत आहे. त्यामुळे बुलडाणा जिल्ह्यात अघोषित आणीबाणी आहे का..? असा संतप्त सवाल रविकांत तुपकर यांनी उपस्थित केला आहे. सोयाबीन-कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी रविकांत तुपकर यांनी १९ जानेवारीला मलकापूर स्थानकात रेल्वे रोको करण्याचा इशारा दिला होता. मात्र बुलडाणा पोलिसांनी त्यांना १८ तारखेला रात्री मलकापूर कडे जात असतानाच ताब्यात घेतले. बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात नेण्यात आल्यावर त्यांच्याविरुद्ध १५१(३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर त्यांना मध्यरात्री मेहकर पोलीस ठाण्यात नेण्यात आले व पुन्हा बुलढाण्यात आणण्यात आले. १९ तारखेला बुलडाणा न्यायालयाने अटक बेकायदेशीर ठरवत त्यांची सुटका केली. रविकांत तुपकर पोलिसांच्या ताब्यात असतांना त्यांच्या पत्नी ॲड.शर्वरी रविकांत तुपकर यांनी शेतकऱ्यांना सोबत घेऊन मलकापूर येथे आंदोलन केले. शांततेत चालू असलेल्या या आंदोलनातील शेतकऱ्यांना पोलिसांकडून मारहाण झाली. तरी शेतकरी व कार्यकर्त्यांनी नीटपणे पोलिसांच्या काठ्या झेलल्या. तर दुसरीकडे या आंदोलनामुळे मलकापूर पोलिसांनी ॲड. शर्वरी रविकांत तुपकर, अमोल राऊत, निलेश नारखेडे, साचिन शिंगोटे, सुरज देवले, नितीन राजपुत, विनायक सरनाईक, अकाश राऊत, गजानन भोपले, अर्चना तुपकर, रुपाली जेऊघाले व इतर ३२ कार्यकर्ते शेतकऱ्यांवर कलम १८६, १४३ भारतीय दंड संहीता, कलम १३५ मुंबई पोलीस कायदा नुसार गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान रविकांत तुपकरांना मेहकर पोलीस स्टेशन येथे नेण्यात आल्यानंतर तिथे जमा झालेल्या कार्यकर्त्यांवर पोलिसांनी मुंबई पोलीस कायद्याचा कलम १३५ नुसार गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये डॉ. ज्ञानेश्वर प्रकाश टाले, शर्वरी रविकांत तुपकर, प्रफुल्ल देशमुख, विनायक सरनाईक, नितिन राजपुत, वैभव आखाडे, देवेंद्र आखाडे, सर्जे रावबाप्पू देशमुख, अनिल बोरकर, सुरेश ढोणे, बाळू देवकर, दशरथ बोरे, गोपाल मंजुळकर,जितु अडेलकर, साजन शहा अब्दुल शहा, अमोल बोरे, विनोद पऱ्हाड, किशोर गारोळे, आशिष रहाटे यांच्यासह २५ ते ३० कार्यकर्त्यांचा समावेश आहे. तर रविकांत तुपकर यांच्या अटकेचा निषेध म्हणून वरवंड फाट्यावर निदर्शने केल्याप्रकरणी देखील पोलिसांनी दत्तात्रय जेऊघाले, संजय खारे, दिलीप राठोड, लक्ष्मण शेलार, प्रमोद कल्याणकर यांच्यासह अन्य तिघांवर कलम १३५ नुसार गुन्हा दाखल केला आहे. रविकांत तुपकर यांनाच बेकायदेशीर अटक करण्यात आली आणि त्यानंतर त्यांचा अटकेचा निषेध करणाऱ्या व शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी केलेल्या आंदोलकांवर देखील पोलिसांनी गुन्हे दाखल करून एक प्रकारे आंदोलकांवर दडपशाही करण्याचा हा प्रकार केल्याची चर्चा सर्वसामान्य जनतेत आहे.



# पायी चालणाऱ्या महिलेचा ऑटोच्या धडकेत मृत्यू...

**जनसंचलन/ शेगाव**

दवाखान्यातून पायी घरी जात असलेल्या महिलेला भरधाव ऑटोने धडक दिल्याने महिलेचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी खामगाव रोडवरील गुरुकृपा हॉटेलसमोर घडली. जगदंबा नगरात राहणाऱ्या अलकाबाई अरुण ढगे यांची प्रकृती बरी नसल्याने त्या खामगाव रोडवरील गजानन महाराज दवाखान्यात गेल्या होत्या. उपचारानंतर रस्त्याने पायी जात असताना मागून भरधाव वेगात आलेल्या ऑटो क्रमांक एमएच-२८, बीए-१०२६ ने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ढगे गंभीर जखमी झाल्या. त्यामुळे त्यांना लगेच सईबाई मोटे रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून अलका ढगे यांना मृत घोषित केले. याप्रकरणी मृतकचा मुलगा अमोल ढगे याच्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी ऑटोचालक अमोल विष्णु हुरपडे (रा. पिंपळगाव काळे) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करून त्यास अटक केली. शेगाव पोलिस पुढील तपास करीत आहेत. दुसरीकडे शेगावातील मार्गावरून वाहन चालक अस्ताव्यस्तथपणे वाहने चालवत आहेत. त्यातून येथे अपघाताच्या घटना वाढल्या आहेत.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....

**निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर**

पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666

* उपलब्ध सुविधा *

- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार

डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

**बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..**

| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | गुंतवणूक रक्कम ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

**ठेवींवरील आकर्षक व्याजदर**

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ४.००% | ४.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस | | ७.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ७.००% | ७.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत | | ८.००% | ७.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर | | ८.००% | ७.००% |
| ६ | डबल बम्पर ठेव योजना | | ७.००% | - |
| ७ | २४ महिन्यांच्या वर | | ७.००% | ७.००% |
| ८ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ९ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ६.००% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

रू. ५ लाख पर्यंतच्या ठेवींना डि.आय.सी.सी.चे संरक्षण कवच प्राप्त आहे.

पुन्हा एकदा...
**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

**दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली**

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# डॉ.राहुल मगर यांना राज्यपाल यांच्या हस्ते सुवर्णपदक प्रधान...



जनसंचलन/मेहकर

बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव माळी तालुका मेहकर म्हटलं म्हणजे समोर येते ती संस्कृती, प्रत्येक क्षेत्रात पुढारलेलं गाव, खेळ, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक असे कुठलेही क्षेत्र असो प्रत्येक क्षेत्रात उच्चपदस्थ अधिकारी या गावात आहे. पुन्हा एकदा यामध्ये डॉक्टर राहुल वसंतराव मगर यांनी भर घालून या बहादराने तर इतिहासाचा अभ्यास करता करता इतिहासाचा संशोधक झाला आणि देऊळगाव माळी चे नाव जगाच्या नकाशावर कोरले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये डॉक्टर राहुल वसंतराव मगर हे सध्या कार्यरत आहे. त्यांनी विद्यापीठातील इतिहास विषयातील सर्वोत्कृष्ट विद्यावाचस्पती ( ) थेसिस ला इतिहासकार वा.शी. बेंद्रे सुवर्णपदक दिले जाते. या सुवर्णपदकाचा मानकरी डॉक्टर राहुल मगर हे झाले आहे. २०२२ २३ या अकादमी वर्षातील सुवर्णपदक १२३ व्या पदवी प्रदान समारंभात पुणे येथे डॉक्टर राहुल मगर यांना महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. रमेश बैस व मान्यवरांच्या शुभहस्ते प्रधान करण्यात आली. डॉ.मगर यांनी प्राध्यापक डॉ. श्रद्धा कुंभोजकर यांच्या मार्गदर्शनाखाली मध्ययुगीन भारतातील बुऱ्हानपूरच्या नागरिकांचा अभ्यास केला आहे. या अगोदर त्यांनी साता समुद्र पार जाऊन आपल्या भारताचा महाराष्ट्राचा इतिहास जगाला दाखवून दिला. व तेथील इतिहास याचा सुद्धा अभ्यास करून त्यावर संशोधन ते करीत आहे. नुकत्याच झालेल्या उपयुक्त कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल महामय श्री रमेश बैस, हजर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून विनय सहस्त्रबुद्धे माजी खासदार राज्यसभा, विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक सुरेश गोसावी, कुलगुरू प्राध्यापक पराग काळकर, प्राध्यापक विजय खरे, आधी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. डॉक्टर मगर यांच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# जिजाऊ आणि स्वामी विवेकानंदांना शाहिरी पोवाड्यातून आझाद हिंदचे अभीवादन...

जनसंचलन/बुलढाणा

राजमाता जिजाऊ स्वाभिमानाने जगणाऱ्या आणि लढणाऱ्या प्रत्येकाचे प्रेरणास्थान आहे. जगाला हेवा वाटावा असेच जिजाऊंचे कर्तृत्व आणि संस्कार आहेत. जिजाऊंच्या संस्कार आणि कर्तृत्वातूनच छत्रपती शिवराय आणि छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्य घडवीले. असे मत आझाद हिंद संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सतीशचंद्र रोठेंनी व्यक्त केले. स्थानिक आझाद हिंदच्या संपर्क कार्यालयात १२ जानेवारीला सायंकाळी रमाई ब्रिगेड,किसान ब्रिगेड, रणरागिनी ब्रिगेड, बहुजन महिला संघटना, राणी लक्ष्मीबाई सहगल ब्रिगेड,आझाद हिंद महिला संघटना, आझाद हिंद शेतकरी संघटना यांच्या संयुक्त विद्यमानाने राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंदांना शाहिरी, पोवाड्यातून अभिवादन तथा जिजाऊ लेकींच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रबोधनकार रोठेंनी उपरोक्त विचारांची सुमनांजली जिजाऊंना समर्पित केली. सामूहिक माल्यार्पण करून शाहीर सुमनताई आहेर यांनी जिजाऊ वंदनेने अभिवादनाला सुरुवात केली. राजीव गांधी मिलिटरी स्कूलचे उपप्राचार्य प्रा.शैलेश वारे यांच्या अध्यक्षतेत तर सुरेखाताई निकाळजे, पंचफुलाबाई गवई, आशाताई गायकवाड, सुमनताई राजपूत, योगिता रोठे,उमेश श्रीवास्तव कायस्थ, संजय चावला, प्रबोधनकार अँड सतीशचंद्र रोठे यांच्या प्रमुख उपस्थित जिजाऊ शाहिरी, पोवाडा आणि कर्तुत्वान जिजाऊ लेकींच्या सत्कार समारंभाला सुरुवात करण्यात आली. जिजाऊंच्या जीवन कार्यावर उपस्थित मान्यवरांनी मनोगतातून तर शाहिरांनी शाहिरीतून प्रकाश टाकला. यावेळी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, महिला बचत गट, जीवनावश्यक वस्तूंची घरगुती निर्मिती करणाऱ्या सत्कारमूर्ती प्रमिलाताई सुशीर, सिमा कायस्थ,मनीषाताई चिंचोले, वर्षाताई ताथरकर, जोत्सना नागरे, वनिता रोठे यासह कर्तुत्वान जिजाऊ लेकींचा सत्कार प्रमाणपत्र, साडीचोळी, स्मृतीचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नाट्य कलाकार शशिकांत इंगळे, प्रा.गणेश काळुसे,विजय सातव, उमेश कायस्थ,अमोल दूतोंडे, नितीन तापडिया, नितीन जयस्वाल,अस्लम शाह,श्रीकृष्ण पाटील यासह सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देऊन जिजाऊ लेकींना सन्मानित केले. यशस्वीतेसाठी आयोजक संघटना प्रतिनिधी तथा सामाजिक क्षेत्रातील जिजाऊ लेकींनी अथक परिश्रम घेतले. अन्नदान आणि पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटना खालील मागण्यासाठी आक्रमक !

जनसंचलन/मेहकर

मेहकर तहसिलदार साहेब यांच्या मार्फत मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांना तथागत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांच्या नेतृत्वाखाली निवेदन सादर करण्यात आले आहे कि, नव्या वाहन चालक कायद्याच्या विरोधात देशभरातील चालक समुहामध्ये मोठा संताप आहे. बेरोजगार भूमिहीन शोषीत दलित बहुतांश गरीब असलेले लोक ड्रायव्हर लाईनमध्ये आलेले आहेत. त्यांची अवस्था अत्यंत बिकट आहे. सहा सहा महिने ते कुटुंबाला सुध्दा भेटत नाहीत. त्यांची साधी कामगार म्हणून नोंद सुध्दा नाही. त्या कामगाराचे वेतन हे धोरण सुध्दा लागू नाही. कुणी पाच तर सहा सात हजार रुपयात महिनाभर काम करीत आहेत. आणि अशा वेळी सात लाख रुपये दंड आणि दहा वर्ष शिक्षा जर नव्या कायद्यानुसार मिळणार असेल तर त्याला घटना घडताच स्वतःला संपवून घ्यावे लागणार आहे. नवा कायदा हा जाचक आहे. भयभीत करणारा आहे. विरोधात चालक वर्ग रस्त्यावर उतरलेला आहे. तरी तात्काळ



नवीन वाहन कायदा हा रद्द करण्यात यावा व वाहन चालकांना सरकारी दरमहा भत्ता देण्यात यावा २) मानवतेला काळीमा फासणारी घटना नांदेड जिल्ह्यात रोहा पिंपळगांव येथे घडली आहे. एका ६ वर्षाच्या मराठा समाजाच्या चिमुकलीचे अपहरण करुन तिला मारुन टाकण्यात आले आहे. २२ तास मुलगी बेपत्ता होती. सदर १९ किलोमीटर अंतरावर तिचा मृतदेह आढळून आला आहे. आरोपी अद्यापही फरार आहे, तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्यावतिने तीव्र शब्दात या घटनेचा निषेध करीत आहे. तरी त्यात पोलीसांनी २२ तासात मुलगी सापडली नाही, पोलीसांनी तात्काळ भूमिका घेऊन कारवाई केली असती तर ती चिमुरडी गेली नसती. राज्यात पोलीसांची भिती ही राहिलेली नाही. संबंधीत पोलीस अधिकारी यांना निलंबित करावे. व तपास सीआयडी मार्फत करुन प्रकरणाची चौकशी करावी व आरोपींना तात्काळ अटक करुन फाशीची शिक्षा देण्यात यावी.आशी मागणी तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे अन्यथा संपूर्ण महाराष्ट्र राज्य भर तीव्र आंदोलन करण्यात येईल


## मराठा महिला अर्बन

मराठा महिला अर्बन

को-ऑपरेटिक क्रेडीट सोसायटी लि, बुलडाणा

पत्ता. ग्रीन वर्ल्ड नर्सरी जवळ, चिखली रोड, सुंदरखेड, बुलडाणा

पाहिजेत

| अ.क्र. | पदमान | शैक्षणिक अहर्ता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | शाखाधिकारी | पदधिकारी (G.D.C & A) शाखधिकारी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव. | ०१ |
| २ | लिपीक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०५ |
| ३ | कर्जअधिक्षक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०२ |
| ४ | शिपाई | १० वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०२ |
| ५ | पिगमी एजेन्ट | पदविधर / १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०६ |
| ६ | वाहन चालक | १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०१ |

इच्छुक उमेदवार यांनी आपल्या बायोडाटा / शैक्षनिक कागदपत्रे व पासपोर्ट फोटो सहखालील ई-मेल वर पाठवावा.marathamahilaurban157@gmail.com

तसेच मुलाखतीची वेळ आणि दिनांक संपर्क करुन कळविण्यात येईल

माहितीसाठी संपर्क

सोनु राऊत (हॉटेल मराठा चिखली रोड, बुलडाणा)

मो. ९६२३५ ५३३३३, ९१५८०००१५७ वर कॉल करु शकतात.

# प्रभूराम त्यांना आशीर्वाद नव्हे, तर शाप देतील निमंत्रणावरुन खासदार संजय राऊत यांची टीका...

**वृत्तसंस्था/ नाशिक**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरेंना अयोध्येच्या सोहळ्याची निमंत्रणपत्रिका उशिरा दिली. मात्र, नटनट्यांना हे निमंत्रण अगोदर पोहोचले असून, हा नतद्रष्टपणा, दळभद्रीपणा आहे. ठाकरे कुटुंबीयांचे अयोध्येच्या लढ्यात योगदान असताना त्यांना अशी वागणूक दिली जात असेल, तर प्रभूश्रीराम अशा लोकांना शाप दिल्याशिवाय राहणार नाहीत, अशी टीका खासदार संजय राऊत यांनी केली. २०२४च्या निवडणुकीत प्रभू श्रीरामांचे आशीर्वाद त्यांना मिळणार नाहीत. शिंदे गटाचा बाळासाहेब ठाकरे आणि अयोध्येशी दुरान्वये संबंध नाही. रामाने ज्यांचा वध केला, अशी ही पात्रे आहेत, अशी घणाघाती टीकाही त्यांनी केली.

ठाकरे गटाच्या अधिवेशनाच्या तयारीच्या निमित्ताने खासदार राऊत यांचे शनिवारी (दि.२०) सायंकाळी नाशिकमध्ये आगमन झाले. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना राऊत यांनी शिंदे गटासह भाजपवर जोरदार टीकास्त्र डागले. ते म्हणाले की, स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे नाशिकवर विशेष प्रेम होते. त्यामुळेच त्यांच्या जयंतीदिनी २३ जानेवारी रोजी नाशिकमध्ये महाअधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. बाळासाहेबांचे स्मारक मुंबईत असले तरी या अधिवेशनातून त्यांना अभिवादन केले जाईल. सोमवारी अयोध्येत रामलल्ला प्रतिष्ठापना सोहळा होत आहे. अयोध्येतील लढ्यात बाळासाहेबांचे मोठे योगदान होते. नाशिकच्या भूमीत संपूर्ण रामायण घडले. त्यामुळे नाशिकच्या भूमीतून रामायण घडविण्यासाठी येथे महाअधिवेशन होत असून, या माध्यमातून आम्ही काही निर्णय घेणार आहोत, असे राऊतांनी सांगितले. सध्या रामाच्या पूजेचे ढोंग रचून रावणाचे राज्य सुरू आहे. ते सत्यवचनी असते, तर असे वागले नसते. जनतेच्या न्यायालयात त्यांचे मुखवटे समोर आल्याने त्यांचा तीळपापड झाला आहे. त्यामुळेच ठाकरे गटाचे नेते आणि पदाधिकाऱ्यांवर शासकीय यंत्रणांना हाताशी धरून खोट्या कारवाया सुरू असल्याचा आरोप राऊतांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नाशिक दौऱ्यावरही राऊत यांनी टीका केली. सावरकरांच्या नावाचा राजकीय जप करणाऱ्यांना नाशिक दौऱ्यावर आल्यानंतर सावरकरांचा विसर पडला. काळाराम मंदिरात दर्शन घेतले. परंतु, या मंदिरात ज्यांती सत्याग्रह केला, त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचीही त्यांना आठवण झाली



नाही. आम्हाला मात्र विस्मरण होणार नाही. उद्धव ठाकरे नाशिकमध्ये आल्यानंतर २२ जानेवारीला सर्वप्रथम भगूर येथील सावरकरांच्या स्मारकाला भेट देतील, असे राऊत यांनी सांगितले.

## चांगलं सांगणं पडलं महागात डोके फोडून केले जखमी

**जनसंचलन/ चिखली**




चिखली शहरात दिवसेंदिवस गुन्हेगारीची घटना वाढताना दिसून येत आहे. घरासमोर भांडण सुरू असताना ते समजून सांगण्यासाठी गेले असता त्यांना मारहाण करून जखमी केले आहे. ही घटना दिनांक १९ जानेवारीच्या रात्री ९.३० वाजेच्या सुमारास घडलेली आहे. सविस्तर वृत्त असे की, शेख शमशेर शेख रशीद वय ३४ यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ते त्यांच्या कुटुंबासह घरामध्ये असताना त्यांच्या घरासमोर भांडणाचा आवाज येत होता. त्यामुळे तुमच्या भांडणाचा त्रास होतो येथे भांडू नका असे त्यांनी महम्मद परवेज यांना म्हटले असता महम्मदनेच त्यांच्यावर हल्ला करून डोक्याला दगड मारून शिवीगाळ देण्यास सुरुवात केली व जीवा मारण्यास धमकी दिली. त्यामुळे माझ्या जीविकास लोका निर्माण होण्याची शक्यता असलेचे सांगून शेख शमशेर शेख रशीद यांनी चिखली शहर पोलीस स्टेशनला येऊन आरोपी विरुद्ध तक्रार दिली पोलिसांनी तक्रार दाखल करून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## बुलडाणा जिल्ह्यातून पहिले विद्यार्थी प्रा. प्रफुल खंडारे पत्रकारिता विषयात उत्तीर्ण...

**जनसंचलन/ नांदुरा**

श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय नांदुरा येथे वाणिज्य विभागात सीएचबी तत्वावर कार्यरत तसेच जय महाराष्ट्र वृत्तवाहिनीचे बुलडाणा जिल्हा प्रतिनिधी प्रा. प्रफुल भगवान खंडारे हे नुकतीच यूजीसी डिसेंबर २०२३ ची नेट परीक्षा पत्रकारिता या विषयात उत्तीर्ण झाले आहेत. ते कॉमर्स या विषयातून नेट सेट या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण असून यंदा झालेल्या यूजीसीच्या डिसेंबर २०२३ च्या नेट परीक्षेत त्यांनी बाजी मारली आहे. यंदाच्या या परीक्षेत देशभरातून ९ लाख ४५ हजार ९११ विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. काही मोजके विद्यार्थीच दरवर्षी ही परीक्षा उत्तीर्ण होत असतात, बुलडाणा जिल्ह्यातून पत्रकारिता या विषयात ही परीक्षा उत्तीर्ण करणारे प्रा. प्रफुल भगवान खंडारे हे पहिले विद्यार्थी ठरले. लवकरच ते आपली नोटबंदी विषयातील डॉक्टरेट देखील पूर्ण करणार आहेत.




